**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विविध अभ्यास मंडळावर पदव्युत्तर शिक्षक वर्गवारीत नामनिर्देशनासाठी अर्ज परिचयपत्रासह पाठविण्याबाबत सूचना

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने सर्व संबंधितांच्या माहितीसाठी कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ४०(२)(b)(ii) च्या तरतुदी तसेच महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र असाधारण भाग चार-ब मध्ये दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजी विहित केलेल्या पात्रतेच्या अधीन राहून कुलगुरुंना विद्याशाखानिहाय विविध अभ्यास मंडळावर पदव्युत्तर शिक्षक या वर्गवारीमध्ये नामनिर्देशनाद्वारे सदस्य नामनिर्देशित करावयाचे आहेत.

कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी निर्देशित केल्याप्रमाणे सदहू अधिनियमातील अभ्यास मंडळाशी निगडीत तरतुद व त्यानुषंगाने महाराष्ट्र शासनाने विहित केलेल्या पात्रतेच्या अधीन राहून पदव्युत्तर शिक्षक या वर्गवारीसाठी सर्व संबंधितांकडून विहित प्रपत्रात आणि महाराष्ट्र शासनाने विहित केलेल्या पात्रतेनुषंगानेच आवश्यक असलेल्या किमान दस्ताऐवजांसह अर्ज परिचय पत्रासह (बायोडाटा) सोमवार, दि. १ ऑक्टोबर, २०१८ रोजी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) कुलसचिव कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचेकडे सादर करावयाचे आहेत. एकापेक्षा जास्त मंडळावर नामनिर्देशनाकरिता अर्ज सादर करावयाचे असल्यास प्रत्येक जागेसाठी स्वतंत्र परिचयपत्र सादर करावे लागतील.

याबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या www.sgbau.ac..in या संकेतस्थळावर दिलेली आहे. तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी आणि आपला अर्ज परिचय पत्रासह विहित मुदतीत सादर करावा, असे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी कळविले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २१/०९/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी